॥ श्री ॥

# योजकाचा योजक

मानवाच्या सांस्कृतिक इतिहासात चरित्र वाङ्मयाला विशेष स्थान असण्याचे कारण, या वाङ्मयातून सिध्द झालेल्या धारणांनी ''धर्मो धारयते प्रजा:'' हा महर्षि जैमिनीचा विचार अधिक दृढ करत विविध प्रकारचा समृध्दींचा आविष्कार प्रचितीस आणून दिला आहे. लहानमोठ्या कामातून जीवनाचे कार्यप्रवाह प्रकर्षाने अथवा हळूवारपणे जेंव्हा प्रकट होतात, तेंव्हा त्यातून मिळणारी प्रेरणा, स्फूर्ती व निर्माण होणाऱ्या कर्मप्रवृत्ती या निश्चितपणे आश्वासक, स्फूर्तीप्रद असतात. विधायकतेला आवाहीत करतात. प्रेमाच्या पखरणीतून कष्ट सूकर करतात. मंगल आशिर्वादांचा वर्षाव करतात व लक्ष्मीला आवाहीत करत, एकाचेच नव्हे तर अनेकांचे जीवन व्यवहार सुरळीत करतात. नवरसातील कोणता रस कोणाच्या चरित्रात कसा उतरेल हे नेमकेपणाने सांगता येत नाही. पण संस्कृती कोणतीही असली देयकालादी व्यवहार कशाही प्रकारे होत असले तरीही विविध प्रकारच्या प्रवृत्ती साक्षीत्व इत्यादी गुणांनी मनुष्य सुशोभित होत असतो.

कोकणाच्या मातीला प्रकर्षाने तीन प्रकारचे सुगंध आहेत. १) काव्यातून मिळालेल्या अनुभूतींना जीवनात कसे वापरावे हे कळते, २) व्यावहारिक क्षेत्रामध्ये विचार वैभव कर्मप्रवाहाच्या मागे कसे उभे करावे याची जाणीव होते, ३) वाट्याला आलेले यश उत्तम रितीने कसे पचवावे व विनित वृत्ती ठेवून कर्मप्रवाह सतत सजग कसा राखावा हे ही उमजते. केवळ महाराष्ट्रालाच नाही तर भारताला कोकणाने अविस्मरणीय असे महापुरूष देऊन भारतमातेच्या चरणी कोकणातील व्यक्तींनी आपल्या देहभावसुमनांजली समर्पित केल्या आहेत.

श्री कृष्णा परशुराम भिडे उर्फ नाना भिडे यांचा जन्म वेसुर्ले वाडीत ९ जून, १९३१ रोजी झाला. हे गाव रत्नागिरीच्या कुशीत चुळबूळ करते. श्री.भिडे यांच्या घरी विचारसमृध्दी होतीच होती, पण त्याचबरोबर आपल्या स्वत:च्या कुटुंबाबरोबर अनेकांच्या कुटुंबविषयक आस्थाही होती. स्वतंत्र विचाराच्या या कार्यकुशल कुटुंबाने ज्या प्रकारे लोकव्यवहार केला, तो पाहिला तर त्यांच्याविषयीचा आदर मधूसेवन केल्यावर जसा आनंद होतो, तसा आनंद वाढवणारा आहे.

श्री. नाना भिडे हे माझ्या सद्‌गुरूंचे शिष्य होय. माझे सद्‌गुरू स्वामी स्वरूपानंद यांचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते असेल तर मनुष्याने कर्मप्रवाह सुरू ठेवावा व आपले स्वरूपानुसंधान अधिक सुस्वरूप करावे हाच त्यांचा उद्देश व जीवनाचे प्रयोजन होते. नाना भिडे यांनी विविध व्यवसाय केले. व्यवसायात नुसतीच साथ मिळते असे नाही, काही वेळा वाट्याला विषण्णता, विषाद येतो. पण गुरूकृपेच्या आशिर्वादाने कष्टातून होणाऱ्या जखमा सो ऽऽ हं च्या पांघरूणाने हळूवारपणे संतुलीत करत, त्यांनी बऱ्या केल्या व सत्याच्या पाऊलवाटेने उचित व्यवहार समृध्द करत ते चालत राहिले. उत्तम प्रकारे व्यवसाय करत असताना लक्ष्मीची प्रार्थना करावीच लागते. इतरांच्या भावमानसपिंडाचा विचार करत करत ही त्यांची प्रार्थना सफलही झाली व लोकांना आनंददायी ठरली. ‘योजक’ चा आजचा व्यवहार लक्षात घेता घराघरातील स्वयंपाकघरात योजकची निर्मिती जेंव्हा अनेकांच्या जीभेची गोडी वाढवते, तेंव्हा त्यांची उत्पादने पोटात जाता, जाता हळूच बुध्दीत प्रवेश करतात, त्यांना आशिर्वाद देतात व चित्तात कायमची विसावतात.

.. ३ ..

श्री. भिडे हे कुटुंबवत्सल आहेत. त्यांचे वात्सल्य त्यांच्याकडे येणाऱ्या समाजातील कोणत्याही स्तरातील व्रूक्तीला प्रांजळ प्रेमाचे असेच जाणवते व ते काही देतात व आशिर्वाद खेचून घेतात.

माझ्या सद्‌गुरूंना अभिप्रेत असणाऱ्या सर्व गोष्टी त्यांनी मनाने पुरस्कृत करत स्वात्मानुभवाच्या आनंदाचे तरंग अनेकांच्या चिदाकायात सिध्द केलेले आहेत. माझे सद्‌गुरू स्वामी स्वरूपानंद देहात होते. तेंव्हा त्यांनी श्री. भिडेंच्या सेवेचा स्विकार केलाच केला, पण ते विश्वात्मक झाल्यावर भिडेंच्या कार्याला विश्वात्मकतेचा आकार देत देत सामान्यांपासून असामान्यांपर्यंत योजकची उत्पादने म्हणजे जणू काही आनंदाचे निदानच अशी काही जादू करून ठेवली.

प्रस्तुत चरित्र श्री. भिडे यांच्या प्रत्यक्ष कार्याची थोडी फार ओळख करून देते. त्यांच्या कर्माच्या अव्यक्त धारणा व्यक्त धारणांबरोबरच अनेकांना प्रेरणा व स्फूर्ती देत राहतील यात शंका नाही. कोकणचा आंबा सर्वश्रुत, सर्वांच्या अनुभूतींचा आहे. श्री.भिडेंच्या उत्पादनातील मधूररस सर्वांना सततच सेव्य वाटतो. तो सेवून हे चरित्र वाचून आपणांस तृप्ती मिळो व माझ्या सद्‌गुरूंच्या प्रबलतम आशिर्वादात आपलेही आशिर्वाद मिसळून जावोत अशी प्रार्थना सद्‌गुरूचरणी करून लेखनसीमा करतो.

**गुरूनाथ वि. मुंगळे.**